# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

==================================================

**बातमी क्र. १**

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) विद्यापीठात बाहेरगावाहून येणाऱ्या महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांना प्रशासकीय इमारतीपर्यंत येण्यासाठी १५ सायकली विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गेल्या आठवड्यात जळगाव जिल्हा रोटरी परिवाराच्या वतीने विद्यापीठास ७५ सायकली देण्यात आल्या. यापैकी १५ सायकली १८ ऑगस्ट पासून हायवे लगतच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ठेवण्यात आल्या आहेत. त्यासाठी सायकल स्टॅण्ड उभारण्यात आले आहे. बाहेरगावाहून मुख्य प्रवेशद्वाराजवळ बसने उतरल्यानंतर प्रशासकीय इमारतीकडे येण्यासाठी महाविद्यालयीन कर्मचारी अथवा विद्यार्थ्यांना वाहन उपलब्धते अभावी पायी यावे लागत असे. आता त्यांचा हा त्रास कमी होणार असून प्रवेशद्वाराजवळ ठेवण्यात आलेल्या सायकलीने ते विद्यार्थी भवनाजवळ येवून तेथील सायकल स्टॅण्डवर सायकल लावून आपल्या कामासाठी जावू शकतात. काम झाल्यावर परत प्रवेशद्वाराजवळ सायकलीने परतता येईल. विद्यार्थी भवन व मुख्य प्रवेशद्वाराजवळ संबंधितांची नोंद केली जाईल.

गुरुवारपासून या सुविधेला प्रारंभ झाला असून यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, व्य.प. सदस्य प्रा.जे.बी. नाईक, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी, सुभाष पवार आदी उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) : तरूणांमधील नवसंकल्पांना चालना देण्यासाठी राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागातर्फे राज्यभर स्टार्टअप यात्रा काढण्यात आली असून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी या यात्रेचे उद्घाटन केले.

उद्योजकीय नवसंकल्पनांसाठी या यात्रेतून जनजागृती केली जाणार आहे. या संकल्पनांसाठी रोख पारितोषिके देखील शासनाकडून दिले जाणार आहे. यात्रेतील मोबाईल व्हॅन ही शाळा, महाविद्यालये आदी ठिकाणी जनजागृती करेल. विद्यापीठात या स्टार्टअप यात्रेच्यावेळी नवसंशोधन, नवोपक्रम व सहचर्य कंपनीचे संचालक प्रा.भूषण चौधरी, प्रा. विकास गिते तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नितेश मल्होत्रा, निखील कुलकर्णी, दुष्यंत बांभोडे आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.:- कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:-१८ ऑगस्ट,२०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिधिनी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी